गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले | अंक २२३ वा | मंगळवार ०२ जानेवारी २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 223 | Date : 02/01/2024 | blow :Tuesday | Page 4 | Price 4

## हिट अँड रन कायद्याविरोधात ट्रान्सपोर्ट युनियनच्या संपाचा दुसरा दिवस; इंधन तुटवड्याचं संकट उद्भवणार?



मुंबई : हिट अँड रन कायद्याविरोधात ट्रान्सपोर्ट युनियनच्यावतीनं संप पुकारण्यात आला आहे. आज या संपाचा दुसरा दिवस आहे. त्यामुळे आजपासून सर्व खासगी बसच्या चालकांसह इंधन वाहतूक करणाऱ्या टँकरचे चालकही संपावर जाणार आहेत. त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणी पेट्रोल पंपावर पेट्रोल, डिझेल भरण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. ट्रक चालकांच्या संपामुळे पेट्रोलची वाहतूक होणार नसल्याने नागरिकांनी वाहनांमध्ये पेट्रोल भरण्यासाठी पंपावर मोठ्या रांगा लावल्या आहेत. तर छत्रपती संभाजीनगरमध्ये एसटी महामंडळाकडे दोन दिवस पुरेल एवढाच डिझेलचा पुरवठा शिल्लक आहे. त्यामुळे ट्रकचालकांच्या संपाचा एसटीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

हिट अँड रन कायदा विरोधात ट्रान्सपोर्ट युनियनच्या सुरू केलेल्या संपाचा फटका शालेय विद्यार्थ्यांना बसण्याची शक्यता आहे संपामुळे अनेक पेट्रोल पंपांवर डिझेल उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांना शाळेतून ने-आण करण्यासाठी असलेल्या स्कूलबस बंद ठेवण्याचा निर्णय स्कूल बस मालक संघटनांनी घेतला आहे. त्यामुळे पेट्रोल पंपावर डिझेल उपलब्ध होत नसल्याने स्कूल बसेस रस्त्यावर धावणार नाही, असं स्कूल बस मालकांनी सांगितलं आहे. मुंबईतही या संपाचा परिणाम आता मुंबईतही । **पान २ वर**

## नववर्षाच्या आनंदावर विरजण; शक्तिशाली भूकंपाच्या धक्क्यांनी जपान हादरलं, त्सुनामीचाही इशारा

नवी दिल्ली : नववर्ष सुरू झालं आहे, येतं वर्ष अनेक गोष्टी घेऊन आलं आहे आणि त्याबाबत अनेक भविष्यवाण्या जगभरातील जोतिषांनी केल्या आहेत. अनेक जोतिषांनी २०२४ च्या काळात अनेक संकट जगावर येणार असल्याची भविष्यवाणी केली होती. आता ही भविष्यवाणी खरी ठरतेय की काय? असा प्रश्न सर्वांना पडला आहे. यासाठी कारण ठरलंय जपानमध्ये सातत्यानं जाणवत असलेले भूकंपाचे धक्के.

२०२४ चा पहिला दिवस जपानसाठी शुभ ठरला नाही. देशात एकापाठोपाठ एक भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. मध्य जपानच्या भागात नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी भूकंपाचे धक्के जाणवले. जपानमध्ये सातत्यानं जाणवलेल्या भूकंपांच्या धक्क्यानंतर त्सुनामीचा इशाराही देण्यात आला आहे. जपानमधील प्रशासकीय अधिकाऱ्यांनी किनारी भागात राहणाऱ्या लोकांना लवकरात लवकर उंच ठिकाणांवर जाण्याचा सल्ला दिला आहे. जपानच्या हवामान खात्यानं इशारा दिला आहे की, काही भागांत पाच मीटर उंचीच्या लाटा उसळण्याची शक्यता आहे. भूकंपाची तीव्रता इतकी होती की, रेल्वे आणि मेट्रोही थांबवण्यात आल्या होत्या. जपानमधील तीस हजार घरांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. सरकारनं आणखी काही काळ भूकंपाचे धक्के जाणवू शकतात, असा इशारा दिला आहे. भूकंपानंतरचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. जपानमध्ये भूकंपानं कसा हाहाकार माजवला आहे, याचे अंगावर शहारे आणणारे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहेत.

## महाराष्ट्राला पुन्हा अवकाळीचा धोका!



मुंबई : देशासह राज्यात थंडीची वाट पाहायला मिळत असताना पुन्हा एकदा अवकाळीचा धोका असल्याचं दिसून येत आहे. राज्यातील बहुतेक जिल्ह्यामध्ये तापमानात मोठी घट झाली आहे. दरम्यान, आता हवामान बदलामुळे राज्यावर पुन्हा एकदा राज्यावर अवकाळी पावसाचं संकट आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, आज राज्याच्या काही भागात पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना कडाक्याच्या थंडीचा सामना करावा लागत आहे. येत्या काही दिवसात लोकांना कडाक्याच्या थंडीचा सामना करावा लागणार असल्याचे भारतीय हवामानशास्त्र विभागाने (IMD) म्हटलं आहे.

राज्यात अनेक भागात पहाटे आणि रात्री कडाक्याची थंडी पाहायला मिळत आहे, तर दिवसा तापमानात वाढ झाल्याचंही दिसून येत आहे. आता महाराष्ट्राला पुन्हा अवकाळीचा धोका असल्याचा अंदाज आयएमडीने वर्तवला आहे. राज्यात काही भागात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील काही भागात हलक्या पावसाची शक्यात हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामानातील बदलामुळे पावसाची शक्यता वर्तवण्यात आलीय. येत्या दोन दिवसांत । **पान २ वर**

## अयोध्येत राम मंदिरात स्थापन होणारी मूर्ती ठरली

### मूर्तीकार अरूण योगीराज यांनी साकारलं प्रभू श्रीरामाचं तेजस्वी रूप



अयोध्या : अयोध्येत २२ जानेवारी रोजी रामललाच्या मूर्तीचा भव्य अभिषेक सोहळा पार पडणार आहे. अयोध्येत उभारण्यात येत असलेल्या भव्य राम मंदिरातील रामललाच्या । **पान २ वर**

**रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त ठरला**

श्री रामजन्मभूमी ट्रस्टचे सदस्य नृपेंद्र मिश्रा यांनी माहिती देत सांगितलं की, मंदिराच्या पहिल्या टप्प्याचं काम डिसेंबरपर्यंत पूर्ण होईल. १४ ते १५ जानेवारी या कालावधीत संत आणि ऋषीमुनींच्या हस्ते अभिषेकासह प्राणप्रतिष्ठेला सुरुवात होणार आहे. २२ जानेवारी रोजी रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी २० जानेवारी ते २४ जानेवारी दरम्यान कोणत्याही दिवशी या सोहळ्याला उपस्थित राहू शकतात. पंतप्रधान मोदी अयोध्या दौऱ्याबाबत अद्याप कोणतीही निश्रि्चत तारीख झालेली नाही.

## जगन्नाथ मंदिरात भाविकांसाठी आता 'वेशभूषा संहिता'

### मंदिर परिसरात गुटखा, पान सेवन, प्लास्टिक आणि पॉलिथिन वापरावरही बंदी



पुरी : श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाने १२ व्या शतकातील या पुरातन धार्मिक स्थळात अपुरे कपडे, फाटक्या जीन्स, स्कर्ट आणि बिनबाह्यांची वस्त्रे (स्लीव्हलेस) परिधान केलेल्या भाविकांच्या प्रवेशावर बंदी घातली आहे. भाविकांसाठी देवस्थानाने ठराविक वेशभूषा संहिता (ड्रेस कोड) अनिवार्य केली आहे. तसेच नवीन वर्षांपासून मंदिर परिसरात गुटखा आणि पान खाण्यावर तसेच प्लॅस्टिक आणि पॉलिथिनच्या वापरावर देवस्थानाने संपूर्ण बंदी घातली आहे. श्री जगन्नाथ मंदिर प्रशासनाच्या (एसजेटीए) एका अधिकाऱ्याने सांगितले की, मंदिर प्रवेशासाठी भाविकांना सभ्य वस्त्र परिधान करावे लागतील. या आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्यांना दंड आकारण्यात येत आहे. दरम्यान, नववर्षांच्या दिवशी भगवान जगन्नाथाच्या दर्शनासाठी पुरीमध्ये भाविकांनी मोठी गर्दी केली होती. पहाटे एक वाजून ४० मिनिटांनी रांगेत ताटकळत उभे असलेल्या भाविकांसाठी मंदिराचे दरवाजे पुन्हा उघडण्यात आले. पुरी पोलिसांनी 'एक्स'वर एका नमूद केले, की सोमवारी दुपारी बारापर्यंत एक लाख ८० हजारांहून अधिक भाविकांनी जगन्नाथ धामचे दर्शन घेतले.

## भीमा कोरेगाव विजयस्तंभाला आंबेडकरी अनुयायांचे अभिवादन

पुणे : नववर्षाचा पहिला दिवस आणि शौर्यदिनानिमित्त भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला लाखो आंबेडकरी अनुयायांनी सोमवारी अभिवादन केले. विजयस्तंभाला फुलांची सजावट करण्यात आली आहे. प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे.



पंचक्रोशीत कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी राज्यभरातील विविध ठिकाणांहून अनुयायी आले आहेत. युवकांनी पुण्यापासून दुचाकी फेरी काढून भीमा कोरेगाव गाठले. प्रवासातील गावांमध्ये नागरिकांनी अभिवादनास येणाऱ्या अनुयायांना न्याहरी तसेच चहा देऊन पुढील मार्गक्रमण करण्यासाठी ताजेतवाने केले.

विजयस्तंभ परिसरात रविवारी मध्यरात्रीपासून आतषबाजी तसेच सामुदायिक बुद्ध वंदनेने कार्यक्रमास सुरुवात झाली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकाळी विजयस्तंभास अभिवादन केले. समता सैनिक दल, महार रेजिमेंट सेवानिवृत्त सैनिक आणि सैनिक दलातर्फे मानवंदना देण्यात आली.रविवारी रात्रीनंतर नगर रस्त्यावर वाहनबंदी करण्यात आली होती. अनुयायांसाठी २९ ठिकाणी आरोग्य बूथ उभारण्यात आले असून २० फिरते बाईक आरोग्य पथके, ५० रुग्णवाहिका, ९० तज्ज्ञ डॉक्टर्स आणि २०० आरोग्य कर्मचारी नियुक्त केले आहेत. तसेच जवळच्या खासगी रुग्णालयात पुरेशा औषध साठ्यासह शंभर खाटाही आरक्षित करण्यात आल्या आहेत.

अभिवादन करण्यासाठी कोरेगाव भीमा आणि पेरणे । **पान २ वर**

## नववर्षाच्या प्रारंभीच भारताची अवकाश भरारी

मुंबई : अवकाशातील वेधशाळेसह, दहा उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण आणि त्यांना इच्छित कक्षेत प्रस्थापित करण्याचा भारतीय अवकाश संशोधन संस्था - इस्रोने आज नववर्षाच्या प्रारंभीच विक्रम केला आहे. इस्रोच्या 'एक्सपोसॅट' या महत्वाकांक्षी मोहिमेच्या अभूतपूर्व यशाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वागत केले आहे.

तसेच इस्रोचे आणि या मोहिमेत सहभागी सर्वांचे अभिनंदन केले आहे.

विशेष म्हणजे या मोहिमेतील दहा उपग्रहांपैकी एक उपग्रह मुंबईतील के.जे.सोमय्या महाविद्यालयाचा आहे. यासाठीही मुख्यमंत्र्यांनी या महाविद्यालयातील वैज्ञानिक उपक्रमशीलतेचे कौतुक करून यात सहभागी संशोधक विद्यार्थी, अध्यापक- तज्ज्ञांचे अभिनंदन केले आहे. 'नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी इस्रोने भारतीयांना एक वैज्ञानिक भेट दिली आहे. चंद्रयान - ३ मोहीम, आदित्य - एल १, गगनयान १ या लागोपाठ यशस्वी मोहिमांनी इस्रोने भारतीयांची मान गौरवाने उंचावली आहे. या यशा पाठोपाठ आता अवकाश संशोधनाला मोठी गती मिळेल. 'एक्सपोसॅट'च्या यशाने भारतीयांचा अवकाश संशोधनातील आत्मविश्र्वास उंचावला आहे. या यशामागे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची वैज्ञानिक आणि अवकाश संशोधनाला पाठबळ देण्याची भूमिका महत्त्वाची ठरली आहे, असे नमूद करून मुख्यमंत्र्यांनी इस्रोच्या या मोहिमेत सहभागी वैज्ञानिकांचे, संशोधक, अभियंते, तंत्रज्ञ तसेच तमाम विज्ञान जगताचे अभिनंदन केले आहे. इस्रोच्या पुढील सर्वच मोहिमांना, प्रयोगांसाठी सुयश चिंतिले आहे.

## महार रेजिमेंटचे माजी सैनिक व समता सैनिक वतीने शौर्य स्तंभाला मानवंदना

पुणे/प्रतिनिधीः २०६ वा भीमा कोरेगाव शौर्य दिन आज खूप हर्ष उत्साहात रात्री साडे अकरा वाजता ३१ डिसेंबर ला शौर्य स्तंभाला मानवंदना देऊन धुमधडाक्यात साजरा करण्यात आला, आतिषबाजी करण्यात आली सदर मानवंदनाला तमाम देशभरातून आलेले महार रेजिमेंटचे माजी सैनिक तसेच समता सैनिक दलातील हजारो सैनिक आनंदराज आंबेडकर यांच्या उपस्थित उत्साहात साजरा केला.

एक जानेवारी रोजी सकाळी नऊ वाजता महार रेजिमेंटच्या पेंडॉलमध्ये सर्व सैनिकांसह मार रेजिमेंट फ्लॅगला ध्वजारोहण करण्यात आले महा रेजिमेंटच्या माजी सैनिक तसेच परिवारासह मान वंदना देण्यात आली महार गान गाऊन महामान वंदना देण्यात आली. बँड पथकासह मार्च पास करण्यात आला रॅली काढण्यात आली रॅलीमध्ये पंचशील चा ध्वज जय भीम तिरंगे आणि महा रेजिमेंट फ्लेक्स मार्च पास करण्यात आला मार्च पास करत विजय स्तंभाला महामानवंदना देण्यात आली विजय स्तंभाजवळ ७०० सैनिका सह ठीक साडेनऊ वाजता महामानवंदना देण्याकरिता अनुशासनात्मक प्रक्रियेमध्ये माजी सैनिकांनी विजय स्तंभाला मानवंदना दिली महार गाना सोबत सर्वांनी आपले योगदान दिले. आजच्या या कार्यक्रमाला महा रेजिमेंटचे देशभरातील सैनिक व सैनिक परिवार यांनी येऊन शोभा



वाढवली. हे यश सिद्धी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य तसेच भिमा कोरेगाव महार सैनिक समन्वय समिती यांच्याकडून सर्व कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन करण्यात आले विजय स्तंभाला मानवंदा देऊन मार्च पास करत वापस आपल्या पेंडॉलमध्ये सर्व सैनिकांनी आपले आपले विचार व मनोगत व्यक्त केले काही लोक शूरवीरांचा सत्कार करण्यात आला स्पोर्ट्स पसंत सत्कार करण्यात आला विशेष प्राधान्य प्राप्त अशा महिला एडवोकेट डॉक्टर खेळाडूंचा गुणगौरव करण्यात आला व त्यांचा शाल श्रीफळ नारळ देऊन महिलांना साडी बुके देऊन त्यांचाही मानसन्मान करण्यात आला. च्या कार्यक्रमाला १००० च्या वर आणि महार सैनिक आणि उपस्थिती दर्शविली यामध्ये प्रामुख्याने बाहेरील राज्यांमधून जसे दिल्ली उत्तर प्रदेश कर्नाटका तामिळनाडू केरला एमपी छत्तीसगड येथील माजी सैनिकांनी सदर कार्यक्रमाला उपस्थिती दर्शविली. सदर कार्यक्रमांमध्ये काही मान्यवरांचे आवर्जून उपस्थिती आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड साहेब . अनोरी कॅप्टन बाबू कोलके साहेब मार्गदर्शक, राज्यउपाध्यक्ष शिवपुत्र घटकामले , कोषाध्यक्ष शामराव भोसले , जनरल सेक्रेटरी कैलास खिल्लारे, ऍड.राजेंद्र कुमार खोब्रागडे साहेब कॅप्टन सुभाष कंकाल साहेब सुभेदार वसंत मस्के साहेब, सुभेदार मेजर बनसोड साहेब आणि पांडुरंग राऊत साहेब राहुल तांगडे साहेब, माननीय गजानन इंगळे साहेब सतीश नाईक सुदाम चावरे कॅप्टन बाजीराव सोनवणे असे ७०० पेक्षा जास्त महा रेजिमेंटचे अनेक तथा इतर महार सैनिक सदर कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली होती आजचा कार्यक्रम अविस्मरणीय असा थाटामाटात गाजावाजा साजरा करण्यात आला आजचा क्षण सर्वांना टिपण्यासारखा असा अतुलनीय कार्यक्रम पार पडला.

# संपादकीय

## तर काँग्रेस यशस्वी होईल...

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी आता ‘भारत न्याय यात्रा’ काढणार आहेत. या यात्रेला मणिपूर राज्यापासून सुरुवात होणार असून ती महाराष्ट्रात संपणार आहे. १४ जानेवारी ते २० मार्च या कालावधीत ही यात्रा होईल. लोकसभेच्या जास्त जागा असलेल्या अनेक राज्यांमधून ही यात्रा जाणार आहे. यात्रेचा मार्ग आखताना लोकसभेच्या ३५५ जागांचा परिसर ‘यात्रे’द्वारे फिरला जाणार आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी या यात्रेला म्हणूनच काँग्रेसच्या दृष्टिकोनातून महत्त्व असणार आहे. ही यात्रा काँग्रेसच्या बळकटीकरणासाठीच काढली जात आहे. राहुल यांची ही यात्रा ज्या राज्यांतून जाणार आहे, त्यापैकी बहुतांश राज्ये अशी आहेत जेथे इंडिया आघाडीतील जागांच्या समन्वयाबाबत गंभीर समस्या आहेत किंवा अशा समस्या येण्याची शक्यता आहे. यामध्ये बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश व अगदी महाराष्ट्राचाही समावेश होतो. यात्रेनिमित्त संबंधित भागात काँग्रेसला आपला दावा पक्का करता येणार आहे. पाच राज्यांच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसची कमी झालेली ‘पॉवर’ दिसून आलीच, त्यामुळे इंडिया आघाडीतील काँग्रेसची पॉवरही कमी झाली. इंडिया आघाडीची स्थापना झाली तेव्हा काँग्रेस प्रमुख पक्ष म्हणून पुढे आला होता. परंतु, हाराकिरीनंतर काँग्रेसची इभ्रत कमी झाली आहे. परिणामी बार्गेनिंग पॉवर वाढवण्यासाठी काँग्रेसने ही ‘भारत न्याय यात्रा’ काढण्याचा निर्णय घेतला आहे. ही यात्रा मणिपूरपासून काढण्यात येणार आहे. या राज्यात महिलांवर अमानुष अत्याचार झाले होते. त्यामुळे देशभरात संतापाची लाट पसरली होती. हीच बाब समोर ठेवून ‘न्याय यात्रे’चे नियोजन करण्यात येत आहे. भाजपने आजवर भारतीयांवर कसा अन्याय केला, विविध स्वप्ने दाखवून कशी दिशाभूल केली याचा पाढा या यात्रेत वाचण्यात येईल. प्रत्यक्षात न्याय मागण्यापेक्षा राजकीय वजन वाढण्यासाठीच काँग्रेसची ही यात्रा असेल असे दिसते. भारत न्याय यात्रा येत्या १४ जानेवारीला सुरू होईल. तिचा २० मार्चला समारोप असला तरी फेब्रुवारी महिन्यात लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यावेळी यात्रा थांबवण्याशिवाय काँग्रेसकडे पर्याय नसेल. याच काळात राहुल यांच्या देशभर सभाही होतील. त्यामुळे ही यात्रा काही दिवसांपुरतीच असेल असा अंदाज आहे. अर्थात अयोध्येतील राम मंदिराच्या लोकार्पणामुळे सर्वच माध्यमांचा आणि नागरिकांचाही फोकस तिकडेच असेल. हा फोकस बदलण्यासाठी ‘भारत न्याय यात्रे’चे औचित्य असेल. काँग्रेस यामध्ये किती यशस्वी होईल हे आगामी काळातच समजेल.

पान १ वरुन

## हिट अँड रन कायद्याविरोधात

दिसून येत आहे. काही दिवस पेट्रोलच्या टंचाईला जाण्याच्या भीतीने मुंबईतील कुर्ल्यातील पेट्रोल पंपावर काही लोकांनी ड्रममध्ये पेट्रोल भरुन नेलं. पेट्रोलबाबत व्हॉट्सअॅपवर मेसेज आल्याचं काही जणांनी सांगितलं. त्यानंतर पेट्रोल पंपांवर पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी मोठी गर्दी झाली.

ट्रान्सपोर्ट युनियनच्या वतीनं संप पुकारल्यानंतर पेट्रोल पंपावर आज सकाळी ७ वाजल्यापासून गर्दी पाहिला मिळत आहे. नांदेडमध्ये काही पेट्रोल पंपावर २ दिवस पुरेल एवढा इंधनाचा साठा शिल्लक आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशीसुद्धा सकाळपासून वाहनधारकांची पेट्रोल भरण्यासाठी गर्दी पाहिला मिळत आहे.

केंद्र सरकारनं मोटर अपघात कायद्यात बदल करून त्यात सुधारणा केली आहे. या विरोधात देशभरातील वाहनचालकांमध्ये तीव्र असंतोष आहे. या कारणावरून देशभरातील वाहतूकदार आणि चालकांनी संप पुकारला आहे. त्यात पेट्रोल-डिझेल वाहतूक करणारे सहभागी झाले आहेत. हे आंदोलन किती दिवस चालणार? हे निश्र्चित नाही, त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा होणार नाही, यामुळे एक दोन दिवसांत मोठ्या प्रमाणात इंधनाची टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेत नागरिक मोठ्या प्रमाणात पेट्रोल डिझेल खरेदीसाठी गर्दी करत असल्याचं चित्र नंदुरबार जिल्ह्यात दिसून येत आहे. सकाळपासूनच पेट्रोल पंप मोठी गर्दी दिसून येत आहे.

राज्यात पेट्रोल तुटवडा होणार असल्याची चर्चा सुरू झाल्यानंतर सगळ्याच जिल्ह्यात पेट्रोलपंपावर वाहन चालकांची गर्दी उसळली आहे. राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त आणि जिल्हा पोलीस अधीक्षकांना शासनाकडून पत्रक जारी करण्यात आले आहे. नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश सरकारने दिले आहे. त्याशिवाय, तेल कंपन्यांना आवश्यक सहकार्य करा अशी सूचना देण्यात आली आहे. संपात सहभागी वाहतूकदारांकडून कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न्न निर्माण होऊ नये यासाठी काळजी घेण्याच्या सूचना सरकारने प्रशासनाला दिल्या आहेत.

नव्या मोटार वाहन कायद्यानुसार ट्रकमुळे एखादा व्यक्ती जखमी झाल्यास त्याला तात्काळ रुग्णालयात नेले पाहिजे, तसे न केल्यास आणि ट्रकचालक दोषी आढळून आल्यास त्याला सात वर्षांची शिक्षा आणि सात लाख रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे. भारतात २८ लाखांहून अधिक ट्रक चालक १०० अब्ज किलोमीटरचे अंतर कापतात. या ट्रकवर ५० लाखांहून अधिक लोकं काम करतात. अशा परिस्थितीत ट्रकमुळे होणारे रस्ते अपघातही सर्रास घडत आहेत. त्यामुळेच सरकारने नवीन कायदा आणला असल्याचं बोललं जात आहे.

# नवीन वर्षाचे स्वागत आणि संस्कृती

३१ डिसेंबर जसजसा जवळ येतोय त्याआधीच साधारणपणे महिनाभरापूर्वीच विकेंड सेलिब्रेशन पार्ट्या यांची जय्यत तयारी चालू असते .कुठे जायचे ? काय करायचे ?कसं साजरा करायचं ? या सर्वांचं नियोजन आजची आधुनिक पिढी ज्यांना पाश्र्िचमात्य संस्कृतीचे भयंकर वेड आहे (आभासी जगाचं )यांच चालू असतं . ३१ डिसेंबरच्या रात्रीचे बारा वाजले की जोरात मोठ्या आवाजाचे फटाके फोडले जातात . मदयधुंद लोक व्यसनाधीन संस्कृतीचं ओंगळवाण प्रदर्शन करताना दिसतात . रात्रीच्या बेरात्री बेधुंदपणे बेजबाबदारपणे रस्त्यावर आरडाओरडा करत बेफिकीरपणे गाड्या चालवत निष्पापांचे बळी घेताना दिसतात . कित्येक धनदांडग्यांची पैसेरी संस्कारांन वाढलेली मुलं याशिवाय चैन म्हणून नववर्षा कडे पाहणारे लोक , फॅशन प्रवाहाच्या विळख्यात अडकलेले गोरगरीब सुद्धा बेजाबबदारपणे संस्कारहीनतने वागताना दिसतात . अमुक ठिकाणी पोलिसांनी छापा मारला अमुक ची मुलगी तमुकचा मुलगा, इथे अपघात तिथे , अपघात थर्टी फर्स्ट पार्टीच्या नावाखाली ब्रेकिंग न्यूज झळकताना आपण पाहतो . अरेरे !काय हे ! संस्कारच नाहीत, स्वातंत्र्य जास्त झालयं , पैसेवाल्यांची मस्ती असे निरर्थक वाचाळ करून आपण बातम्या पाहून सोडून देतो . पण आपण भारतीय कधी या आभासी संस्कृतीच्या विळख्यातून बाहेर येणार ? आपल्या संस्कृतीला पायदळी तुडवणार ?

वरचा मथळा वाचून बऱ्याच जणांच्या भुवया उंचावल्या असतील . काय हे ? मग आम्ही नवीन वर्षाचे स्वागत करायचं नाही का ? तर असं अगदीच नाही बरोबर आहे आपण नवीन वर्षाचे स्वागत केलेच पाहिजे .पण आपण भारतीय आहोत आपल्या ला एक सांस्कृतिक वारसा मिळालेला आहे .आपण आपल्या संस्कृतीत आणि संस्कारात चांगल्या संकल्पनाने स्वागत केले पाहिजे . रात्रीचे बारा वाजता फटाके फोडून नाच गाणे मोठमोठ्याने आरडाओरडा करून मित्रांच्या झोपेचं खोबरं करून नव्हे , मदयधुंद होऊन वाहने चालवून अपघात करून निष्पापांचा बळी घेऊन तर नक्कीच नाही . घरच्यांशी खोटे बोलून साजरा करणे नव्हे . केक कापून एकमेकांच्या तोंडावर फासणं आणि अन्नाचा अपव्यय करणे . जे रस्ते ज्या सार्वजनिक भिंती या सार्वजनिक ठिकाणी नको ते संदेश लिहून आपल्या संस्कारांचा संस्कृतीचा आणि सार्वजनिक मालमत्तेचा विद्रूप पणा करणे म्हणजे नवीन वर्ष साजरा करणे नव्हे . रात्री पहाटेपर्यंत धिंगाणा घालून एक जानेवारीला जेलमध्ये किंवा घरी सकाळी दहा दहा वाजेपर्यंत झोपणे हे नवीन वर्षाचे स्वागत सुजलेल्या लालसर तारवटलेल्या डोळ्यांने आपण करणं योग्य आहे का ? झोपमोड झालेल्यांच्या शिव्या शाप खाणं हे आहे का नवीन वर्षाचे स्वागत !डोळे सुजवून नवीन वर्षाचे स्वागत मान्य आहे का ?

मान्य आहे आपण सर्व भारतीयांचे सर्व दैनंदिन व्यवहार इंग्रजी महिन्याप्रमाणे चालतात किंबहुना आपण सर्व ठिकाणी याच तारखांचा वापर करतो . हे आपण स्वीकारलेल आहे . तेवढेच काय, त्यातल्या त्यात आपण तर महाराष्ट्रीयन, मराठीचा अभिमान बाळगणारे . आपल्यापैकी किती जणांना स्वतःची जन्मतारीख मुलांच्या जन्मतारखा लग्नाचा वाढदिवस या तारखा इंग्रजी महिन्यांच्या तारखेप्रमाणे तोंडपाठ असणारे आपण याच तारखा मराठी महिन्याप्रमाणे सांगू शकतो का ? कमीत कमी माहिती तरी आहेत का ?तर नाहीऽ ऽ हेच सर्वांच उत्तर असणार आहे . मग वैचारिक बाब अशी की पश्र्िचमात्यांची तयारी महिना महिना करतो तेव्हा आपलं स्वतःचं मूळचं सर्व काही विसरून जातो . पहा पटतंय का नवीन गोष्ट स्वीकारत असताना जुनं सुद्धा सोबत घ्यायलाच हवं .

मराठी महिन्याचे स्वागत जसं आपण गुढी उभारून करतो तसेच इंग्रजी महिन्याचे स्वागत सुद्धा एखाद्या धार्मिक सामाजिक कौटुंबिक हिताच्या कार्याने करावं . विचारात घेण्याची बाब आहे का नाही पहा एक जानेवारी चे स्वागत आई-वडिलांचे चरण धुवून त्यांच्या आशीर्वादाने करावे म्हणजे वृद्धाश्रम ही संकल्पना नष्ट होईल . नववर्षाचे स्वागत अन्नदान करून करावे . गरजवंतांना दानधर्म करून करावे . कुटुंबासमवेत पूजा अर्चा ध्यान मनन गप्पा करून करावे . एखादा स्वच्छतेचा ,अंधश्रद्धा निर्मूलनासाठीचा , वृक्ष लागवडीचा ,ऐतिहासिक किल्ले वास्तू राजवाडे यांच्या जिर्णोद्धाराचा करून करावे . अनाथ आश्रमांना भेटी देऊन मदतीचा हात द्यावा . उंच ध्येय स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प करावा . एखाद्या सरकारी शाळेतील मुलांच्या चेहऱ्यावर हास्य आणणारा उपक्रम हाती घ्यावा .स्वराज्य निर्माणकरून स्वाभिमानाने जगण्याचा हक्क देणारे छत्रपतींचा शिवाजी महाराजांचा इतिहास त्यांचे जीवन चरित्र अभ्यासावं .शिक्षण आणि समाजाचे परिवर्तन घडवून आणणाऱ्या फुले दांपत्यांचा इतिहास अभ्यासावा . लोकशाहीने स्वतःच अस्तित्व सिद्ध करणाऱ्या आंबेडकरांचा इतिहास वाचावा . संयमाने आणि सत्याने इंग्रजांशी प्रखर लढा देणाऱ्या महात्मा गांधीजींचा इतिहास अभ्यासावा . ध्येयाने आणि समाजकार्याच्या विचाराने प्रेरित होणाऱ्या भगतसिंगांचा इतिहासात अभ्यासावा .शून्यातून विश्र्व निर्माण करणाऱ्या नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे चरित्र अभ्यासावं अशा महान कार्य करणाऱ्या प्रेरणास्त्रोतांचे चरित्र पारायणे लावावीत ही चरित्रे आहे त आपली भारतीय संस्कृती आणि परंपरा . हे आहेत आपल्या विकसित भारताचा पाया . नववर्षाच्या निमित्ताने हा पाया भक्कम करणे गरजेचे आहे . म्हणजे विकसित भारताची प्रगत इमारत उभी राहील.

थोरा मोठ्यांच्या समाज सुधारकांच्या क्रांतिकारकांच्या जीवन चरित्रांचे वाचन त्यांच्या जीवनाचे पारायण लावावे . देशभक्ती ची नाटके एकांकिका पोवाडा यांच्या कार्यक्रमांचे आयोजन करून करावे . म्हणजे दुग्धशर्करा योग होईल . संस्कृतीचे जतन व संक्रमण तर होईलच आणि नवीन वर्षाचे स्वागतही होईल .असं करून पहा किती गौरवपूर्ण जेणेकरून नवीन वर्षाच्या स्वागता सोबतच आपल्या भारतीय संस्कृतीचे जतन संवर्धन चालेल . चालीरीती परंपरेचे संस्कारांचे संवर्धनही होईल व नवीन वर्षाच्या स्वागताचा आनंदही होईल . आपला वेगळा भारत वेगळी ओळख वेगळा संकल्प यामध्ये आनंदाची देवाण-घेवाण होईल आणि नव स्वीकारताना जुनं ही सोबत राहील .

मुळात म्हणजे जे आता सध्या नवीन वर्षाचं किती गौरवपूर्ण स्वाभिमानानं अभिमानाने जागृत करणारे कार्य होईल .आणि हे काळाची गरज आहे . कारण आज काल सर्व शिकवणारे क्लासेस आहेत युट्युब लिंक आहेत .पण परिवर्तन संस्कृती संस्कार यांचे क्लासेस अजून तरी नाहीत आणि नसतीलही .आणि सर्वात मोठे सत्य म्हणजे या गोष्टी विकत मिळत नाहीत . त्या अनुभवनं जपणं आणि वाढवणं गरजेचं असतं . तरच आपण सुसंस्कार व आपली भारतीय संस्कृती जतन संवर्धन आणि संक्रमण करू शकतो . विचारधन विचाराधीन होण्याची गरज आहे गतवर्षातील घडामोडी उजळणी सुखदुःख चांगले वाईट अनुभव यातून आपण काय व कोणत्या गोष्टी घेऊन त्यांचे अवलोकन करून नवीन वर्षात पदार्पण करावं हे गरजेचे आहे .कुठेतरी ढाब्यावर हॉटेलात नवीन वर्षाचे स्वागत करून संस्कृतीचे प्रदर्शन करणे कोणालाच पटणार नाही .भारतीय संस्कृती परंपरा आपल्याला सतत एकच सांगतात आमची शाखा कुठेही नाही ! यावरूनच आपण ओळखून घ्यायचं ते जतन करण किती आवश्यक आहे .



**श्रीमती रिंकू अनंतराव जाधवर (धस )**
**विषयशिक्षिका – जि.प .प्रा म शाळा उमरगे**
**ता . अक्कलकोट जि. सोलापूर**
**चेल.९४०३४४९२८५**

## महाराष्ट्राला पुन्हा अवकाळीचा ..

विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रात हलक्या पावसाची शक्यता आहे. पुण्यातदेखील पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर मध्य महाराष्ट्रातील काही आणि विदर्भातील नागपूरसह काही जिल्ह्यात ढगाळ वातावरण राहण्याचा अंदाज आहे.

२०२४ नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी उत्तर पश्र्िचम भारत धुके आणि कडाक्याच्या थंडीने सुरुवात झाली. उत्तर भारतासह महाराष्ट्रही गारठला आहे. हवामान खात्याने तापमानात आणखी घट होऊन कडाक्याची थंडी पडण्याचा इशारा दिला आहे. दिल्ली, पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांमध्ये धुक्यामुळे रेल्वे आणि विमान वाहतुकीवर परिणाम होताना दिसत आहे. रेल्वे आणि विमान उड्डाणे उशिराने सुरु आहेत. पर्वतीय भागात सुरू असलेल्या बर्फवृष्टीमुळे मैदानी भागात थंड वाऱ्यांमुळे तापमानात घट झाली आहे. आयएमडीने थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवली असून थंडीत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. मैदानी भागातून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे राज्यातील तापमानातही कमालीची घट झाली आहे. उत्तर महाराष्ट्रात थंडीची लाट आली आहे.

## भीमा कोरेगाव विजयस्तंभाला

परिसरात येणाऱ्या लाखो अनुयायांना कोणत्याही सुविधा कमी पडणार नाहीत, याबाबतची खबरदारी जिल्हा प्रशासनाने घेतली आहे. यावर्षी मोठ्या संख्येने येणाऱ्या अनुयायांबरोबरच बंदोबस्तावरील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सुविधेसाठी जिल्हा प्रशासनाने वाढीव संख्येने जय्यत तयारी केली होती.

जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, पोलीस आयुक्त रितेश कुमार, जिल्हा पोलीस अधीक्षक अंकित गोयल, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, ‘बार्टी’चे विभागप्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी तयारीचा आढावा घेत सुविधांसाठी संबंधित यंत्रणांना सूचनाही दिल्या आहेत.

## अयोध्येत राम मंदिरात स्थापन

मूर्तीचा अभिषेक २२ जानेवारीला होणार आहे. त्यापूर्वी प्रभू रामाच्या तीन पैकी एका मूर्तीची निवड करण्यात आली आहे. देशातील प्रसिद्ध शिल्पकार अरुण योगीराज यांनी बनवलेल्या प्रभू श्रीराम, सीता आणि हनुमानाच्या मूर्तींची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ’ट्विटर’वर यासंदर्भात माहिती दिली आहे.केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ट्वीट केलं आहे की, अयोध्येत प्रभू श्रीरामाच्या अभिषेकासाठी मूर्तीची निवड निश्र्िचत झाली आहे. आपल्या देशातील प्रसिद्ध शिल्पकार योगीराज अरुण यांनी बनवलेल्या रामाच्या मूर्तीची अयोध्येत स्थापना केली जाणार आहे. पुढे त्यांनी लिहिलं आहे की, प्रभू श्रीराम-हनुमानाच्या अतूट नात्याचं हे आणखी एक उदाहरण आहे. कर्नाटकातील हनुमानाच्या भूमीतून रामललाची ही सेवा आहे यात शंका नाही.

अयोध्येत निर्माणाधीन प्रभू श्रीराम मंदिराचा अभिषेक सोहळा २२ जानेवारीला होणार आहे. या सोहळ्यासाठी अयोध्येतील प्रशासन आणि सरकार पूर्णपणे गुंतलं आहे. दुसरीकडे, राम मंदिरात अभिषेक करण्यासाठी तीन मूर्तींपैकी एकाची निवड केली जाणार होती. आता या मूर्तींची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी अयोध्येतील प्रभू श्रीरामाच्या मूर्तीचा फोटो सोशल मीडियावर शेअर केला आहे. मात्र या मूर्तीची राम मंदिरात प्रतिष्ठापना केली जाणार की नाही, याबाबत अद्याप कोणतीही स्पष्ट माहिती मिळालेली नाही. अरुण योगीराजांच्या मूर्तीची केवळ निवड करण्यात आली आहे.

मूर्तीवर पडणार सूर्याची किरणे

मंदिराच्या गर्भगृहात रामलल्लाच्या दोन मूर्ती असतील. एक प्रभू श्रीरामाच्या बालपणातील आणि दुसरा रामलल्लाची असेल. दरवर्षी रामनवमीच्या दिवशी दुपारी बारा वाजता सूर्याची किरणे श्रीरामाच्या मूर्तीवर पडतील अशा पद्धतीने मंदिराचे बांधकाम करण्यात येत आहे. यासाठी रुरकी आणि पुणे येथील संस्थांमधील शास्त्रज्ञांचे पथक कार्यरत आहे.

रामलल्ला प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात सुमारे १० हजार विशेष अतिथी सहभागी होतील. यामध्ये राम मंदिर निर्माण चळवळीशी संबंधित ऋषी-संत समाजातील लोक आणि देश-विदेशातील आणि विशेषतः उत्तर प्रदेशातील नामांकित लोकांचा समावेश असेल. २६ जानेवारीपासून राम मंदिर भक्तांसाठी खुले केले जाईल, त्यानंतर रामभक्तांना प्रभू श्रीरामाचे दर्शन घेता येणार आहे. नृपेंद्र मिश्रा यांनी सांगितलं की, अयोध्येतील राम मंदिरात दररोज सुमारे ७५ हजार भाविक दर्शन घेऊ शकतील.

# प्रो.डॉ.बसवेश्वर मुडगी यांना ‘भारत गौरवरत्न श्री सन्मान पुरस्कार प्रदान

पानमंगरूळ : पुण्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्थेच्या नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे निवृत्त प्राध्यापक डॉ. बसवेश्र्वर साहेबराव मुडगी यांना शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'भारत गौरवरत्न श्री सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

हॉटेल अशोका, नवी दिल्ली येथे झालेल्या एका समारंभात विविध क्षेत्रातील व्यक्तींना 'भारत गौरव रत्न श्री सन्मान' समितीचे अध्यक्ष तपनकुमार रौतारे यांच्या हस्ते 'भारत गौरवरत्न श्री सन्मान' प्रदान करण्यात आला. यावेळी नरसिंग यादव, संबित पात्रा यांच्यासह 'भारत गौरवरत्न श्री सन्मान' विजेते आणि मोठ्या संख्येने शिक्षणतज्ज्ञ उपस्थित होते. डॉ. बसवेश्र्वर मुडगी अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ गावचे रहिवासी आहेत.



# नववर्षाच्या पहिल्याच दिवशी मंत्रालयात मुख्यमंत्र्यांकडून बैठका आणि आढावा

मुंबई : नववर्षाच्या पहिल्या दिवशी मंत्रालयात उपस्थित राहत बैठकांच्या माध्यमातून आढावा घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील जनतेला आगळ्या वेगळ्या पद्धतीने नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी, आरोग्य यासह विविध विभागांच्या फायलींवर स्वाक्षरी करून त्या हातावेगळ्या केल्या. यावेळी नवनियुक्त मुख्य सचिव डॉ. नितीन करीर यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. मंत्रालयीन अधिकाऱ्यांनी देखील मुख्यमंत्र्यांना नववर्षांच्या शुभेच्छा यावेळी दिल्या.सरकार सामान्यांच्या हितासाठी गतिमानपणे निर्णय घेतानाच त्याची प्रभावी अंमलबजावणी करीत असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे नेहमी आपल्या कृतीतून ते दाखवतात. आज त्यांचे मंत्रालयात आगमन झाले. यानंतर त्यांनी त्यांच्या दालनात विविध विभागांच्या सचिवांची बैठक घेऊन आढावा घेतला. राज्यातील सामान्य नागरिकांसाठी राबवित असलेल्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत मिळाला पाहिजे. राज्य शासन घेत असलेल्या निर्णयांची अमंलबजावणी प्रशासनाकडून केली जाते ती अधिकाधिक प्रभावीपणे केली जावी, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

ठाणे येथील कार्यक्रम आटोपून मुख्यमंत्री मंत्रालयाकडे रवाना झाले. सायंकाळी चारच्या सुमारास त्यांचे आगमन झाल्यावर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भेटून त्यांना शुभेच्छा दिल्या.मुख्यमंत्री सचिवालयाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी,



प्रधान सचिव विकास खारगे यांनी पुष्पगुच्छ देऊन मुख्यमंत्र्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्यमंत्री सचिवालयासह मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.यावेळी नवनियुक्त मुख्य सचिव डॉ. करीर यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या. यावी मुख्यमंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राज्यातील दौऱ्याबाबत आढावा घेतला. नाशिक येथे १२ जानेवारीला होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवाच्या तयारीचा आढावाही यावेळी घेण्यात आला. त्याचबरोबर राज्यातील महत्वाकांक्षी प्रकल्पांचा देखील थोडक्यात आढावा यावेळी मुख्यमंत्र्यांनी घेतला. त्यानंतर त्यांनी वैद्यकीय सहायता निधी, आरोग्य विभाग यासह विविध विभागाच्या फायलींवर स्वाक्षरी करत नववर्षाचा प्रारंभ केला. सायंकाळी उशिरापर्यंत भेटीगाठी, नववर्ष शुभेच्छा स्वीकारण्याचा कार्यक्रम सुरूच होता.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज
मंगळवार दि.०२ जानेवारी २०२४


# पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून विविध विकास कामांची पाहणी

## पालकमंत्र्यांच्या हस्ते कासेगाव येथील रोपवनात वृक्षारोपण

पंढरपूर/प्रतिनिधीः जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून विविध विकासात्मक कामासाठी मोठ्या प्रमाणावर निधी शासकीय यंत्रणांना उपलब्ध करून देण्यात येतो.

निधीतून पूर्ण करण्यात आलेल्या व सुरू असलेल्या कासेगांव येथील वनविभागाच्या तसेच रांझणी येथील विविध विकास कामांची पाहणी उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी केली.

तसेच रांझणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम अपुर्ण असल्याने ते काम त्वरित पुर्ण करावे अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी त्यांच्या त्याच्यासमवेत आमदार समाधान आवताडे, मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे, उपवन संरक्षक धैर्यशिल पाटील, अतिरिक्त मुख्याधिकारी संदीप कोहिनकर,उपमुख्याधिकारी सर्जेराव मिरकले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार , सहा. जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, जि.प. बांधकामचे कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.नरळे, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, वनपरिक्षेत्र अधिकारी चैताली वाघ यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दिलेला निधी व्यवस्थितपणे संबंधित विकास कामावर खर्च होतो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते, त्याच अनुषंगाने पंढरपूर तालुक्यातील कासेगाव व रांझणी येथील विविध विकास कामांची पाहणी केली असून, रांजणी येथील पशुवैद्यकीय दवाखान्याचे काम अपूर्ण आहे.

तरी संबंधित ठेकेदारांनी पुढील एका महिन्याच्या आत दवाखान्याचे काम पूर्ण करावे अन्यथा कारवाई करण्यात येईल, असे निर्देश त्यांनी दिले. सार्वजनिक विकास कामे करताना ती गुणवत्तापूर्ण, दर्जेदार, टिकाऊ आणि वेळेत पूर्ण होईल याकडे लक्ष द्यावे.तसेच विकास कामांसाठी मंजूर निधी मुदतीत खर्च करण्याबाबतच्या सूचना दिल्या.तसेच वन विभागाने औषधी वनस्पतींची लागवड करावी जेणेकरून त्यातून उत्पन्न मिळाल्याने इतर विकास कामासाठी त्या निधीचा वापर करता येईल असे पालकमंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी कासेगाव (ता.पंढरपूर) येते अटल आनंद घन वन प्रकल्पाअंतर्गत तयार करण्यात आलेल्या रोपवनाची व रोपवाटिकेची पाहणी केली.रांझणी (ता.पंढरपूर) येथे जिल्हा नियोजन च्या निधीतून रांझणी ते चळे या रस्त्याची, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वर्ग खोल्यांची पूर्ण झालेल्या कामांची पाहणी केली. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना मुख्य इमारत व प्राथमिक आरोग्य केंद्राची मुख्य इमारत, कर्मचारी निवासस्थान या ठिकाणी सुरू असलेल्या कामांची पाहणी केली. यावेळी पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते कासेगाव रोपवनामध्ये वृक्षारोपणही करण्यात आले.



विकास कामांची पाहणी करताना संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाबाबत माहिती घेतली. तसेच मार्गदर्शक सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.

पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच इतर राज्यातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात. भाविकांसह स्थानिक नागरिक तुळशी वृंदावन पाहण्यासाठी येत असतात परंतु सद्यस्थितीत तुळशी वृंदावन बंद असल्याने ते लवकरात लवकर सुरू करावे तसेच कासेगांव विसावा येथे सभामंडप बांधण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना आमदार समाधान आवताडे यांनी दिल्या. जिल्हा नियोजन समितीमार्फत ग्रामीण रस्ते विकास योजनेअंतर्गत रांझणी ते चळे या १.५०० किलोमीटरच्या रस्त्यासाठी १० लाख ७७ हजार रुपये खर्च झाले असून रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. प्राथमिक शाळा इमारत बांधकामासाठी २१ लाख ६२ हजार रुपये खर्च झाले असून इमारत बांधकाम पूर्ण झाले आहे. तसेच पशुवैद्यकीय दवाखाना मुख्य इमारत बांधकामासाठी ४० लाखांचा निधी मंजूर असून, आतापर्यंत ३१ लाख ४० हजार रुपये खर्च करण्यात आले असून काम सुरू आहे. प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, कर्मचारी निवासस्थान, संरक्षक भिंत बांधकाम करण्यासाठी ४ कोटी १९ लाख २८ हजार रुपये इतका निधी मंजूर असून आतापर्यंत ०२ कोटी ३३ लाख ३६ हजार रुपयाचा निधी खर्च झाला असून काम प्रगतीपथावर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी यावेळी सांगितले.मौजे कासेगाव (ता.पंढरपूर) येथील जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निकृष्ट वनाचे पुनर्वनीकरण, अटल आनंद घन वन प्रकल्पाअंतर्गत रोपवनात विविध रोपांची व औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. यामुळे जैवविविधतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असल्याचे उपवन संरक्षक धैर्यशील पाटील यांनी सांगितले.

## पंढरपूर येथे १७५ रक्तदात्यांनी रक्तदान करत थर्टी फर्स्ट केला साजरा



पंढरपूर/प्रतिनिधीः सरत्या वर्षाला निरोप आणि नववर्षाचे स्वागत पंढरपुरात विधायक पद्धतीने करण्यात आली तब्बल १७५ रक्तदात्यांनी रक्तदान करून थर्टी फर्स्ट साजरा करत नवीन वर्षाचे स्वागत केले

श्याम गोगाव आणि आदित्य फत्तेपुरकर मित्रपरिवार मित्रपरिवाराच्यावतीने गेली १९ वर्षापासून रक्तदानाची चळवळ थर्टी फर्स्ट रोजी चालवली जाते नगरसेवक आदित्य फत्तेपूरकर यांच्या मित्र परिवाराच्या वतीने पृथ्वीवरची थर्टी फर्स्ट रोजी रक्तदान शिबिर आयोजित केली मराठी यंदाच्या वरची थर्टी फर्स्ट सकाळी नऊ वाजल्यापासून रक्तदात्यांनी रक्तदान करण्यासाठी गर्दी केली तब्बल १७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले यावेळी रक्तदात्यांची नेत्र तपासणी देखील करण्यात आली रक्तदान केल्यानंतर रक्तदात्यांना प्रमाणपत्रासह भेट देण्यात आली

रक्तदान केल्यानंतर वैद्यकीय सल्ल्यानुसार पुढील ४८ तास कुठल्याही प्रकारचे व्यसन अथवा मध्ये घेता येत नाही त्यामुळे थर्टी फर्स्ट रोजी पार्टी डीजे अशा गोष्टींना फाटा देत विधायक पद्धतीने व्यसनमुक्त पिढी घडवण्याचा संकल्प श्याम गोवा आणि आदित्य फत्तेपूरकर मित्र परिवाराच्या वतीने करण्यात येत आहे विशेष म्हणजे सलग गेल्या १९ वर्षापासून थर्टी फर्स्ट रोजी रक्तदानाची ही चळवळ अवैधपणे सुरू आहे

या रक्तदान शिबिरात शिवसेनेचे संपर्कप्रमुख प्रा शिवाजी सावंत अनिल दादा सावंत दिलीप धोत्रे मर्चंट बँकेचे माजी चेअरमन नागेश भोसले विठ्ठल कारखाने चेअरमन अभिजीत पाटील अशा मान्यवरांनी भेट घेऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढवला हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सर्व श्री श्याम गोगाव आदित्य फत्तेपुरकर विठ्ठल कदम बाहुबली गांधी महेंद्र जोशी धनंजय मनमाडकर सत्यवान दहिवाडकर गणेश पिंपळनेर अमित कारंडे संमेलन ताटे गणेश जाधव रोहन शहा अमोल आटकळे संतोष शिरगिरे दत्ता पवार विवेक पाटील विशाल पावले आधी मित्र मंडळांनी अतिशय परिश्रम घेतले

## पानमंगरुळच्या जि. प. प्रा. मराठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी माळी यांची निवड

पानमंगरुळच्या जि. प. प्रा. मराठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी माळी यांची निवड पानमंगरुळ/प्रतिनिधीः पानमंगरुळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा पानमंगरुळ, या शाळेची शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठीत करण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा पानमंगरुळच्या शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी मल्लम्मा यल्लप्पा यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेचे अध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन माजी अध्यक्ष भिमराव सुलगित्ती हे होते. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा मंगरूळ शाळेच्या पालक सभेत शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष म्हणून मल्लम्मा



यल्लप्पा माळी व उपाध्यक्ष म्हणून राजेंद्र देवेंद्र ब ळुरगी यांची निवड करण्यात आली. संजय होटकर, अनसू शिंगे, रेश्मा बजंत्री, काशिनाथ हडपद, हिना कौसर मुजावर, गुरण्णा मुडगी, फारुख मुजावर, सोनाली पतकी, महानंदा पडणूर यांची शाळा व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली. यावेळी अशपाक मुजावर, शरणप्पा बनसोडे, चिदानंद गायकवाड, रवी बनसोडे, महादेव कुडल, केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे, मुख्याध्यापक सुभाष मंगरुळे, शिक्षक महादेव पाटील, शहनाज कोरबू, विनोद कोळी, लता कांबळे, सिद्धाराम वमने, अश्विनी यादव, ममता पटेद हे उपस्थित होते.

## महात्मा ज्योतिबा फुले विचार प्रबोधन कट्ट्याचे उद्या भूमिपुजन



ठाणे : आद्यशिक्षिका सावित्रीबाई फुले जयंती दिनाचे औचित्य साधून येत्या बुधवारी म्हणजेच दि.३ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठाणे कोर्टनाका सर्कल येथे महात्मा ज्योतिबा फुले- क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले विचार प्रबोधन कट्ट्याचे भूमिपुजन करण्यात येणार आहे. विधान परिषदेचे माजी उपसभापती दिवंगत वसंतराव डावखरे यांनी ठाण्यात फुलेंचे स्मारक असावे, अशी संकल्पना मांडली होती. ही संकल्पना पूर्णत्वास जावी, यासाठी ठाणे ओबीसी एकीकरण समितीचे निमंत्रक प्रफुल वाघोले यांनी ठाणे शहरात फुले दाम्पत्याचे स्मारक व्हावे, यासाठी पत्रव्यवहार केला होता. मागील वर्षी गडकरी रंगायतन येथे झालेल्या कार्यक्रमात कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार तथा समन्वय प्रतिष्ठान अध्यक्ष ॲड. निरंजन डावखरे यांनी फुले स्मारकासाठी निधी देण्याची घोषणा केली होती. त्यांनी आपला शब्द खरा करुन निधी उपलब्ध करुन दिला. त्यांच्या विशेष निधीमधून या विचार कट्ट्याची उभारणी करण्यात येत आहे. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कोर्टनाका सर्कल येथे या कट्ट्याचे भूमिपुजन कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार तथा समन्वय प्रतिष्ठान अध्यक्ष ॲड. निरंजन डावखरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या विचार कट्ट्यावर फुले दाम्पत्याचे विचार आणि त्यांचे जीवनचरित्र यांचा प्रचार आणि प्रसार करण्यात येणार आहे. या सोहळ्यास तमाम ठाणेकर बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मंगेश आवळे, ओबीसी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रफुल वाघोले यांनी केली आहे.

## राजाराम शिक्षण संकुल पंढरपूर छत्रपती शिवाजी हायस्कूल व राजाराम इंग्लिश स्कूल मातृ प्राथमिक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने बाजार डे



पंढरपूर/प्रतिनिधी : राजाराम शिक्षण संकुल पंढरपूर संचालित मातृ मंदिर प्राथमिक राजाराम इंग्लिश स्कूल छत्रपती शिवाजी हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक वर्षी बाजार डे हा उपक्रम प्रत्येक वर्षी साजरा केला जातो.

या कार्यक्रमाचे उद्घाटन राजेंद्र कोरके पाटील महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पश्र्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष यांच्या शुभहस्ते रामदास नागटिळक महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ पंढरपूर तालुका अध्यक्ष यांच्या उपस्थितीत संपन्न झाला यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा श्री अँड अरविंद जाधव प्राचार्य सौ रजनी अरविंद जाधव तसेच सर्व शिक्षक पालक विद्यार्थी उपस्थित होते

विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनातील मनावरील असलेला अभ्यासक्रमाचा मानसिक ताण तणाव दूर करून विरंगुळा मेळावा यांच्यातील अंगीकृत सुप्त कलागुणांना वाव देता यावा या उद्देशाने दरवर्षी बाजार डे मेळाव्याचे आयोजन केले जाते. अशी माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अरविंद जाधव व राजाराम इंग्लिश स्कूल पंढरपूर प्राचार्य सौ रजनी अरविंद जाधव यांनी दिली या या बाजार डे मध्ये एकूण ६० विद्यार्थ्यांनी पेक्षा अधिक स्टॉल लावण्यात आले होते यामध्ये विद्यार्थ्यांनी भाजीपाला फळे स्नॅक्सचे दुकान जनरल स्टोअर्स हे दुकान तसेच इतर दुकाने लावण्यात आली होती या आनंद सोहळ्यात विद्यार्थी सह पालक विद्यार्थी विद्यार्थिनी सर्वांनी आनंद घेतला मिळाव्यात विद्यार्थी विद्यार्थिनींनी अतिशय उत्साहाने खूप छान छान चविष्ट चटकदार खाद्यपदार्थ यांचे स्टॉल लावून यांची विक्री केली

पदार्थांची विक्री खरेदी विविध पदार्थांचा आस्वाद घेण्याचा आनंद विद्यार्थी पालक विद्यार्थिनींनी लुटला व हा बाजार डे कार्यक्रम पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले या बाजारडे बाजार डे मध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा श्री अँड अरविंद जाधव यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या

## जीवनात आनंद व्यक्त करायचा असेल तर स्वाभीमानी रहा

### मुन्नाभाई नंदागवळी यांचे प्रतिपादन : निवासी शाळा मुर्री येथे नव वर्ष स्वागत कार्यक्रम साजरा, विद्यार्थ्यांचा वाढला उत्साह

गोदिंया : माणसाला आनंद आहे प्रत्येक वेळी हवा असतो तो मिळविण्यासाठी कोणत्याही स्तराला माणूस पोहोचतो. आनंद हा खरा माणसाच्या जीवनातील महत्त्वाचा दागिणा आहे. त्याला जपण्यासाठी स्वाभिमानी असावा लागतो. हे खरे जीवनचे रहस्य आहे. म्हणून माणसाने जीवनात आनंद व्यक्त करताना स्वाभिमानी रहा असे प्रतिपादन आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक व समाज प्रबोधनकार मुन्नाभाई नंदागवळी यांनी आपले विचार यावेळी व्यक्त केले. ते नविन वर्षाच्या स्वागत कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून बोलत होते.





यावेळी मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या मार्गदर्शनात व मंचावर नीता भलमे यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख मार्गदर्शक अद्यापक मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे, साधना पारधी, टी आर महाजन, अर्चना चव्हाण, दीक्षा तुरकर दीक्षा डाहाके, शीला तांडी आदी मंचावर उपस्थित होते.

जवळच्या शहरालगत असणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा मुर्री येथे विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी नविन वर्षाचे स्वागत समारंभ कार्यक्रम मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी अनेक मान्यवरांनी आपले हात मांडले, नव्या संकल्पना नवे विचार रुजावे यासाठी प्रयत्न केला पाहिजे. नंदागवळी पूढे म्हणाले- नवे जग निर्माण केले पाहिजे, नव्या आकांक्षा रुजविण्याचा पाहिजे, नवा संकल्प हा मनाला उभारी देतो. नवा ध्यास हा आपली स्वप्ने सरकार करतो. असे सर्व उपस्थितांना आपल्या अनमोल वाणीने मंत्रमुग्ध करून नवी ऊर्मी तयार केली. कार्यक्रम संचालन नवव्या विद्यार्थी अनामिक दुर्योधन याने केला तर आभार सावन जाधव यांने मानले. यशस्वीतेसाठी सर्व सांस्कृतिक समितीने सहकार्य केले. वंदे मातरण या गीतानी कार्यक्रम संपला.

## रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन

पंढरपूर/प्रतिनिधीः राज्याचे रोहयो व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्र्वर महाराज जळगावकर यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला. यावेळी मान्यवर पदाधिकारी यांच्यासह मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.



# वटवृक्ष मंदिरात नुतन वर्षाचे उत्साहाने स्वागत

## थर्टीफस्टच्या निमित्ताने भाविकांच्या हर्षोल्हासात रंगला धार्मिक कार्यक्रमांचा सोहळा



अक्कलकोट/प्रतिनिधी: १ येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात कोल्हापूर, मुंबई येथील पारंपारिक भजनी मंडळांच्या भावभक्तीच्या भजन गीतांनी वटवृक्ष मंदिर व परिसरात नुतन वर्षाचे उत्साहाने स्वागत करण्यात आले.

दि : ३१ डिसेंबरच्या रात्रीच्या शेजारतीनंतर कोल्हापुरच्या गंगावेश येथील उत्तम निगवेकर यांच्या ओम स्वामी चैतन्य भजनी मंडळ, मगरमठी येथील श्री.स्वामी समर्थ भजनी मंडळ, दादर मुंबई येथील स्वामी ओम भजनी मंडळ यांच्याही भक्ती गीतांच्या कार्यक्रमात उपस्थित हजारो भाविक भक्ती रसात रंगून गेले. रात्री १ ते पहाटे ४ या वेळेत या भजनी मंडळांचा कार्यक्रम पार पडला. दिनांक ३१ डिसेंबर रोजी रात्री ११:३० ते १२ या वेळेत हजारो उपस्थित स्वामी भक्तांनी एकमुखाने श्री स्वामी समर्थांचे नामस्मरण करुन रात्री १२ वाजता असंख्य फटाक्यांच्या आतषबाजीने मोठया उत्साहात नुतन वर्षाचे स्वागत केले, व एकमेकांना नुतन वर्षाच्या शुभेच्छा देवून सर्वांनी स्वामींचे दर्शन घेतले. या प्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी सर्व भजनी मंडळाच्या प्रमुखांचे स्वामींचे कृपावस्त्र, प्रसाद देवून यथोचित सन्मान करुन नुतन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या या नंतर पुढील कार्यक्रमांना सुरुवात करण्यात आले. रात्री १२ वाजता ओम स्वामी चैतन्य भजनी मंडळाच्या उत्तम निगवेकर व सहकाऱ्यांनी अनेक भावभक्ती गीते व सोंगी भारुड सादर केले. या कार्यक्रमात श्री स्वामी समर्थ, हरी ओम स्वामी समर्थ, साई बाबा बोलो, अवलिया अवलिया, शंकर महाराजा, खंडेरायाच्या लग्नाला, अंजनीच्या सुता, शिर्डीवाले साईबाबा इत्यादी अनेक भावभक्तीगीतांच्या तालावर राज्यातील व अक्कलकोट शहरातील अनेक अबालवृध्दांनी दृढ भक्ती संकल्पाचा आनंद लुटून नुतन वर्षाचा महोत्सव मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केला.

या नुतन वर्षाच्या निमित्ताने पहाटे ५ वाजता श्रींच्या काकड आरतीनंतर व दिवसभर अनेक स्वामी भक्तांनी श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेवून नुतन वर्ष सुख समृध्दीचे, आनंदाचे व भरभराटीचे जावो या करीता स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना केले. सर्व कार्यक्रम यशस्वी होण्याकरीता व सर्व स्वामी भक्तांचे दर्शन सुलभतेने होणेकरीता मंदिर विश्र्वस्त समितीचे चेअरमन महेश इंगळे, धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्याची मोठी तळमळ असलेले महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली समितीचे कर्मचारी, सेवेकरी व भजनी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभाच्या स्मारकासाठी १०० एकर जमीन शासनाने संपादित करावी : केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले

मुंबई / पुणे : भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजयस्तंभा जवळची शंभर एकर जमीन राज्य शासनाने संपादित करून येथे शौर्याची प्रेरणा देणारे

भव्य दिव्य आंतरराष्ट्रीय स्मारक उभारावे.त्यासाठी राज्य सरकार ५०० कोटींच्या निधीची तरतूद करावी अशी मागणी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली. या मागणीसाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटुन लवकरच पत्र देणार असल्याचे ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला नवीन वर्षांच्या पहिल्याच दिवशी ना.रामदास आठवले यांनी भेट देऊन विनम्र अभिवादन केले.

भीमा कोरेगाव लढाई चा इतिहास हा पूर्वाश्रमीच्या महार पूर्वजांच्या अतुलनीय शौर्याचा प्रेरणादायी इतिहास आहे.हा इतिहास डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी ददेशाला दाखवून आमच्यातील शौर्याचा क्रांतीचा निखारा जागृत केला आहे. तीच शौर्याची; क्रांतीची ; संघर्षाची प्रेरणा घेऊन जीवनात मार्गक्रमण करण्याचा आमचा आजचा नवीन वर्षाचा संकल्प आहे असे



ना.रामदास आठवले यावेळी म्हणाले.आंबेडकरी जनतेच्या वतीने दरवर्षी १ जानेवारी हा दिवस शौर्यदिन म्हणून साजरा केला जातो. लाखो आंबेडकरी अनुयायी भीमा कोरेगाव येथील ऐतिहासिक विजय स्तंभाला भेट देऊन विनम्र अभिवादन करतात. त्यासाठी येथे जागा अपुरी पडत आहे.या परिसरातील १०० एकर जमीन राज्य शासनाने संपादित करून भीमा कोरेगाव च्या ऐतिहासिक विजय स्तंभाचे भव्य आंतरराष्ट्रीय स्मारक उभारले पाहिजे. त्यासाठी राज्य शासनाने रु.५०० कोटी च्या निधीची तरतूद केली पाहिजे. असे ना.रामदास आठवले यांनी स्पष्ट केले.

भीमा कोरेगाव येथील विजय स्तंभाला अभिवादन केल्या नंतर पत्रकारांनी विविध प्रश्र्न विचारल्या नंतर नवीन वर्षाच्या शुभेच्छा ही ना.रामदास आठवले यांनी दिल्या. २०२४ हे नवीन वर्ष विकासाचे आणि निवडणुकीचे वर्ष आहे.या वर्षात दलित आदिवासी ज्येष्ठ नागरिक; तृतीयपंथी; दिव्यांग सर्व नागरिकांना आपण न्याय देण्याचा प्रयत्न करू. प्रधान मंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात हे विकासाचे वर्ष ठरणार आहे.मोदींच्या नेतृत्वात सर्वांना न्याय मिळत आहे. नव्या वर्षात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात एन डी ए ४०० पेक्षा जास्त जागा जिंकेल असा विश्र्वास ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केला.



## धाराशिव येथे ५०० शुरवीरांना मानवंदना

धाराशिव/सुधाकर रणदिवे : भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून ५०० शुरवीरांना मानवंदना देण्यात आली. यावेळी विवेक ,(भैय्या )जाधव शहराध्यक्ष सम्यक विद्यार्थ्या आंदोलन, शहर सचिव प्रतीक भैया गंगावणे भीम नगर भागाचे बीट अंमलदार घोडके साहेब, ऋणिकेत राऊत, सागर धाकतोडे, अभिषेक सरवदे, अमर गायकवाड, स्वराज पांडागळे, समाधान गायकवाड ,सर्व सम्यक विद्यार्थ्या आंदोलन व जय भीम प्रतिष्ठानचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# आचेगांव येथे भीमा कोरेगांव शौर्यदिनानिमित्त मानवंदना

आचेगांव/बलवान गोतसुर्वे : आचेगांव ता. दक्षिण सोलापूर तथागत बुद्धविहार व डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मंडळाच्या वतीने १जानेवारी १८१८ला ५०० तत्कालीन महार सैनिकांनी भीमा कोरेगांव लढाई जिंकून दिल्या बद्दल पुणे जिल्ह्यातील कोरेगांव भीमा येथे ब्रिटिशांनी उभा केलेल्या विजयीस्तंभाची प्रतिकृती आचेगांव येथे उभारून त्यास मानवंदना देण्यात आली. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन निवृत्त लोहमार्ग ऐ.एस.आय जगन्नाथ गोतसुर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विकास गोतसुर्वे यांनी भीमा कोरेगांव विजयस्तंभाची माहिती सांगताना कोरेगांव भीमा येथील भीमा नदीच्या काठावर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी व पेशवाई मध्ये झालेल्या लढाईत पेशवाई काळात अस्पृश्यतेचे पालन मोठया प्रमाणात होत होते व त्यांना अत्यंत हिन दर्जाची वागणूक दिली जात होती याचा विरोध म्हणून आत्मसन्माना साठी पेशवाई च्या विरोधात ब्रिटिशांच्या बाजूने ५०० तत्कालीन महारांनी २८००० पेशवाई सैनिकांसोबत युद्ध करून ऐत्याहासिक लढाई जिंकून दिली.त्या प्रित्यर्थ ब्रिटिशांनी त्या ५००शूरवीर सैनिकांच्या योगदानाबद्दल त्यांना मानवंदना म्हणून विजयीस्तंभ उभा केल्याचे सांगितले. यावेळी रिपाई नेते विकास सुर्वे, जगन्नाथ सुर्वे,सोलापूर भाजपा अनु जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे, वंचित आघाडीचे कार्यकर्ते कपिल गोतसुर्वे, जयंती उत्सव अध्यक्ष विशाल गोतसुर्वे या सह राहुल नवगिरे,कटेप्पा घटकांबळे, जालिंदर गोतसुर्वे,प्रदीप गोतसुर्वे, मारुती गोतसुर्वे,कमृद्दीन बिराजदार, शावरसिद्ध कांबळे,सुधाकर



गोतसुर्वे अविनाश वाघमारे,भारत सोनकांबळे, भारत गोतसुर्वे, मनोज गोतसुर्वे, लखन बनसोडे आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल गोतसुर्वे, कपिल गोतसुर्वे, हर्षद सुर्वे, शरद गोतसुर्वे, चेतन कांबळे, प्रदीप गोतसुर्वे अक्षय नवगिरे यांनी परिश्रम केले. यावेळी बहुसंख्येने आंबेडकरी अनुयायी उपस्थित होते.

## इटकुर येथे भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त मानवंदना



कळंब/सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील इटकूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पूजा करून भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त ५०० शूरवीरांना मानवंदना देण्यात आली. जमलेल्या जनसमुदायाला ज्येष्ठ नेते माजी ग्रामपंचायत सदस्य आत्माराम रणदिवे यांनी आपले मनोगत व्यक्त करून भीमा कोरेगाव येथे झालेल्या इतिहासाची माहिती दिली. त्यानंतर वैजीनाथ शिंदे यांनी त्रिशरण पंचशील घेतले. यावेळेस या कार्यक्रमासाठी मिलिंद रणदिवे ,राहुल रणदिवे, पत्रकार सुधाकर रणदिवे ,पत्रकार एल.डी शिंदे, छत्रभुज रणदिवे, शिवहारी शिरसट, वैजीनाथ शिंदे,पुरुषोत्तम शिंदे, आदित्य रणदिवे, लखन रणदिवे, बाबासाहेब शिंदे, रोहित रणदिवे, निलेश शिंदे, किरण लगाडे,पप्पू गाडे, संतोष शिंदे, कृष्णा रणदिवे, पांडुरंग शिंदे, नाना लागाडे, निलेश शिरसट, पुष्पराज शिंदे, विश्र्वजीत शिंदे, कुंडलिक रणदिवे, व इतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जनता विद्यालयाचे घवघवीत यश

सिन्नर/सोमनाथ गिरी : डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात घवघवीत यश संपादन केले. विद्यार्थी उपकरण माध्यमिक गटात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. सदर उपकरणाची जिल्हास्तरावर विज्ञान प्रदर्शनासाठी निवड झाली आहे.



मिठापासून वेल्डिंग तयार करणे हे उपकरण सादर करण्यात आला होते.प्रदर्शनातील सर्वच विद्यार्थी ,मार्गदर्शक शिक्षक व परीक्षक यांनी या उपक्रमाची स्तुती केली . विद्यालयाचे उपक्रमशील प्राचार्य व विज्ञान विषयाचे जेष्ठ शिक्षक किशोर जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कृष्णा सुनील वारुंगसे व जय जितेंद्र शिंदे या विद्यार्थ्यांनी उपकरण सादर केले होते. विद्यार्थ्यांना विज्ञानशिक्षक पी.आर.करपे, डोंगरसिंग रबडे,सोमनाथ पगार यांचे मार्गदर्शन लाभले .सहभागी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस डव्होकेट नितीन भाऊ ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत , मविप्र संस्थेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्कर ढोके, शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे , उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने , प्राचार्य किशोर जाधव, पर्यवेक्षक रामदास वाजे,पालक - शिक्षक संघाचे उपाध्यक्ष अण्णा वारुंगसे, माता - पालक संघाच्या उपाध्यक्ष अर्चना ढोली ,सहसचिव मंजुषा पडवळ आदींसह शालेय समितीचे सदस्य ,शिक्षक व विद्यार्थी यांनी कौतुक केले आहे.

## सैनिक टाकळी,टाकळीवाडी, आकिवाट, राजापुर येथील युवकांनी ३१ डिसेंबर बाजूला सारत घेतले विठुरायाचे दर्शन

सैनिक टाकळी/संजय चव्हाण: शिरोळ तालुक्यातील युवकांनी नवीन तरुण पिढी साठी एक प्रेरणादायी कल्पना राबवली. ३१ डिसेंबर नवीन वर्षाची सुरुवात विठुरायाच्या दर्शनाने घेतली. रात्रीच हे सर्वजण टू व्हीलर ने पंढरपूर येथे गेले. व नवीन वर्षाची सुरुवात विठुराया चरणी मस्तक ठेऊन साजरी केली. या युवकांनी व्यसनापासून दूर राहून भक्तीच्या मार्गाने आपले नववर्षी स्वागत केले. ३१ डिसेंबरला होणाऱ्या खर्चाची रक्कम गरिबांना दानधर्म केले. तरुण वर्गांना व्यसनापासून दूर राहून भक्तीच्या मार्गी लावण्याचा ध्यास या तरुणांनी धरला आहे. प्रत्येक ३१ डिसेंबरला हे तरुण पंढरपूर येथे इथून पुढे प्रत्येक वर्षी दर्शन घेणार आहेत. या तरुणांनी बोलताना मनोगत सांगितले की आम्हाला येथे येऊन खूप छान वाटले.

विठुरायाचे दर्शन लाभले आहे. विठुरायांनी तसेच सर्वांना सुखी व आनंदी ठेव अशी मनोकामना या युवकांनी विठुराया चरणी मागितले आहे. यावेळी वेळी सैनिक टाकळी चे संजय चव्हाण, टाकळीवाडी चे अमोल कुंभार, महेश वनकुंद्रे, आकिवाट चे



अशितोष पवार, राजापूरचे संतोष ढवळी. पंढरपूर मध्ये उपस्थित होते. राम कृष्ण हरी माऊली

# राम मंदिराच्या उभारणीने सुरु होणारे नव वर्ष महाराष्ट्रासाठी सुद्धा उत्साहवर्धक असेल

मुंबई : अयोध्येत बांधण्यात येत असलेल्या भव्य अशा राम मंदिरात प्रभू रामचंद्राच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. मंदिराच्या उभारणीने नव्या वर्षाची उत्साहवर्धक सुरुवात होत असून आपल्या सगळ्यांच्या सहकार्याने महाराष्ट्राची देखील वेगाने प्रगतीकडे वाटचाल होत राहील, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील नागरिकांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.आपल्या शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात की, नव्या वर्षाची सुरुवात प्रभू श्री रामचंद्राच्या जयघोषात होत आहे याचा खूप आनंद आहे. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र जी मोदी यांच्या प्रेरणेतून अयोध्येत भव्य असं राम मंदिर उभारलं जात आहे. करोडो भारतीयांचं स्वप्न पूर्ण होत आहे. नव्या वर्षाची ही सुरुवात निश्र्चितच खूप उत्साहवर्धक आहे.



**नव्या महाराष्ट्राचे चित्र**

आपण सगळे महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी आपापल्या परीनं प्रयत्न करतोय. आपल्याला माहिती आहे की महायुती सरकारने राज्यात दुर्बल, कष्टकरी, कामगार, शेतकरी, महिला यांना डोळ्यासमोर ठेऊन अनेक निर्णय घेतले आहेत, असे सांगून मुख्यमंत्री म्हणतात की, एकीकडे उद्योग, पायाभूत सुविधा वाढवतांना सामाजिक न्यायाचे निर्णय घेऊन महाराष्ट्राला देशात एका उंचीवर नेण्याचा प्रयत्न आपण करतो आहोत. महाराष्ट्राकडे गुंतवणूकदार, उद्योगपतींचा ओढा दिवसागणिक वाढतो आहे. नुकतेच आपण परकीय गुंतवणुकीत परत एकदा देशात पहिल्या क्रमांकावर आलो आहोत. नव्या वर्षात महाराष्ट्राच्या अनेक मोठ्या प्रकल्पांची सुरुवात होत आहे. हे प्रकल्प आयकॉनिक असणार आहेत. एमटीएचएल, कोस्टल रोड, मेट्रो, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गासारखे प्रकल्प सुरु होतील आणि राज्याची वाटचाल वेगानं १ ट्रीलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे होऊ लागेल, असा विश्र्वास मला वाटतो.

**विकासासाठी नव्या संकल्पना सुचवा** मुख्यमंत्री म्हणतात की, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा जागतिक दर्जाच्या करणं यासाठी देखील आपण एक मोठं व्हिजन ठेवलं आहे. ही सगळी वाटचाल एकट्याने नाही तर आपल्या सगळ्यांच्या सहभागानं आणि योगदानानं होणार आहे. विकासासाठी आपण नव्या संकल्पना सुचवा, आपले विचार नवा महाराष्ट्र घडविण्यासाठी निश्र्चितपणे उपयुक्त ठरतील.